| | |
|---|---|
| **<u>इतर किरकोळ फौ. अर्ज नं.५७/२०२६ मधील निशाणी क्रं.१ खालील आदेश</u>.**<br>( अर्चना अंबादास थोरात विरूध्द महाराष्ट्र सरकार तर्फे नेवासा पोलीस ठाणे.) | MHAH150005092026 |

अर्जदाराने प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये गुन्हयातील जप्त मुद्देमाल परत मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदाराने नेवासा पोलिस ठाणे येथे भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे गु.र.नंबर ९२/२०२६ दाखल करण्यात आला. सदर गुन्हयात तपासादरम्यान पोलीसांनी अर्जदाराचे चोरी झालेले अडीच तोळे वजनाचे सोन्याचा पोहेहार व दिड तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस जप्त केले आहे. सबब, सदरचा मुद्देमाल अर्जदारास परत मिळावा अशी विनंती केली आहे.

३. तपासी अधिकारी यांनी आपले म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारीत करावेत असे नमुद केले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर योग्य ते आदेश पारित करावेत असे म्हणणे सादर केले.

४. युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने अभिलेखावर निशाणी ०३ सोबत जप्त मुद्देमालासंदर्भात खरेदी पावती दाखल केली आहे. सदर पावतीचे अवलोकन केले असता सदरचे दागिने हे अंबादास थोरात यांच्या नावे खरेदी केल्याचे दिसून येत आहे. तसेच, अर्जदाराने सदर दागिने तिचे पर्समधून चोरी गेल्याचे कथन केले आहे. तसेच, अंबादास थोरात हा तिचा पती असल्याचे कागदपत्रावरून दिसून येते. सदर मुद्देमाल अर्जदाराच्या ताब्यातून चोरी गेल्याचे दिसून येत आहे. त्यावरुन अर्जातील जप्त मुद्देमाल हा अर्जदाराच्या मालकीचा व कब्जात

असल्याचे दिसून येते. तपासी अधिकारी यांनी दिलेल्या म्हणण्यानुसार अर्जात नमुद केलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेला आहे. तसेच तपासी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने जप्त केलेला मुद्देमाल तिचाच असल्याचे कथन केले आहे. तसेच, विकास टाक यांचे जबाबाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, त्यांनी सदर पोहेहार व गंठन याचे लगड बनवलेले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी सदर मुद्देमाल अर्जदाराचा असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मुद्देमालाचा अंतरीम ताबा अर्जदारास देणे योग्य राहिल. प्रस्तुत अर्जदाराव्यतिरिक्त सदरचा मुद्देमाल इतर कोणीही मागणी केलेला नाही. सबब, सदर अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने मी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

**२.** तपासी अंमलदार यांनी गु.र. नंबर ९२/२०२६ या गुन्हयातील जप्त अडीच तोळे वजनाचे सोन्याचा पोहेहार व दिड तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस (लगड) अर्जदारास खालील नमुद अटींची पुर्तता केलेनंतर परत दयावे.

**अ.** अर्जदाराने तपासी अधिकारी यांच्याकडे रक्कम रू.५,२५,०००/– (अक्षरी पाच लाख पंचवीस हजार रुपये मात्र) रूपयेचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) दयावे.

**ब.** अर्जदाराने तिचे ओळखपत्र तसेच तिच्या रहिवासाचा पुरावा संबंधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल कराव्यात. सदर बाबत संबंधीत अधिकारी यांनी खात्री करावी.

**क.** संबंधीत तपासी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या मुद्देमालाचे रंगित छायाचित्र घेवून ते या मुद्देमालाचेच आहे याबाबत खात्री करून घ्यावी व तसा शेरा फोटोच्या

मागे नमुद करावा.

ड. सदर बाबींची पुर्तता झालेवर संबंधीत अधिकारी यांनी सदरील मुद्देमालाबाबतचा फोटो, पंचनामा तसेच रहिवासी पुरावा आणि ओळखपत्र तसेच वर नमुद हमीपत्र या न्यायालयात दोषारोपपत्रासोबत पाठवावे.

३. या अटी व शर्तींची पुर्तता तसेच कागदपत्रांची योग्य ती पडताळणी झालेनंतरच अर्जदारास मुद्देमाल अर्जात नमुद सोन्याचे दागिने परत दयावे.

४. प्रस्तुत अर्जदार हिने अडीच तोळे वजनाचे सोन्याचा पोहेहार व दिड तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस (लगड) याची सदर केसच्या अंतीम आदेशापर्यंत विल्हेवाट लावण्याची नाही, तसेच त्याच्या मुळ स्वरूपात बदल करण्याचा नाही, आणि आवश्यकता पडल्यास न्यायालय सांगेल त्यावेळी सदरचा मुद्देमाल न्यायालयात हजर करण्याचा आहे.

५. सदर मुद्देमालाची मालकी इतर कोणाची आहे हे आढळून आल्यास सदर अर्जदाराने सदरचा मुद्देमाल न्यायालयात परत करण्याचा आहे.

६. प्रस्तुत आदेशाची एक प्रत संबंधित पोलीस ठाणेस पाठविण्यात यावी.

ANIL SAHEBRAO SONWALKAR Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR Date: 2026.06.15 17:35:05 +0530

**(श्री. ए. एस. सोनवलकर)**
प्रथवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रं.२) नेवासा

दिनांक – १५/०६/२०२६